# शर्ट नी टोट बॅग बनवू

*आपण शर्ट पासून एक आकर्षक टोट बॅग तयार करु शकतो.*

























## लागणारे साहित्य

फुल स्लीव्हज २ शर्ट ( बॅगसाठी आम्ही एक प्लेन आणि एक चेकर्ड शर्ट निवडला आहे. मिडीयम किंवा लार्ज साईझचे शर्ट चालतील )
चॉक
कात्री
बिडेड पिन
मॅचींग दोरे
आणि लुप टर्नर

चला तर मग, सुरुवात करूया.


आता एक शर्ट पूर्णपणे उघडून घ्या. इथे दाखवलं आहे तसं शर्टची पुढची बाजू तुमच्यासमोर असायला हवी. बॅग शिवणे सोपे जावे यासाठी आपण 16 इंच लांब आणि 15 इंच रुंद चौकोनी टेम्प्लेट तयार करून घेतले आहे. शर्टवरचे खिसे टेम्प्लेटखाली येतील अशा रीतीने हे टेम्प्लेट शर्टवर पसरवून घ्या.

शर्टवर टेम्प्लेट ठेवत असताना खिशाच्या वरच्या बाजूला कमीत कमी अडीच इंच तर खिशाच्या बाजूला किमान एक इंच कपडा शिल्लक राहिला पाहिजे याची खात्री करा.

शर्टचा खीसा हा टोट बॅगेचा महत्वाचा भाग आहे हे लक्षात ठेवा. पिन लावून टेम्प्लेट शर्टला जोडून घ्या. तुम्ही लावलेल्या पिन कपड्याच्या दोन्ही लेयरमधून गेल्या पाहिजेत. चॉकने टेम्प्लेटचा आकार कपड्यावर आखा. पिना काढून  टेम्प्लेट बाजूला करा. टेम्प्लेटनुसार आखलेल्या रेघेवरुन कपडा कात्रीने कापून घ्या. हे कापून घेतलेले तुकडे बाजूला ठेवा.

बॅगच्या बेल्टसाठी आम्ही अडीच इंच रुंदीचे वेगळे टेम्प्लेट तयार केले आहे.  या टेम्प्लेटची लांबी शर्टच्या स्लिव्हच्या लांबीएवढी ठेवा. आपल्याला बेल्टसाठी कपड्याचे 3 तुकडे लागणार आहेत. बेल्टचे टेम्प्लेट कपड्यावर ठेवून पिनने व्यवस्थित जोडून घ्या. टेम्प्लेटचा आकार कपड्यावर आखून घ्या. पिना काढून टाका आणि टेम्प्लेट बाजूला करा.
टेम्प्लेटनुसार आखलेल्या रेघेवरुन कपडा कात्रीने कापून घ्या. आपल्याला कपड्याच्या दोन स्ट्रीप मिळतील. तिसऱ्या स्ट्रीपसाठी इथे दाखवल्याप्रमाणे उरलेल्या कपड्यावर परत एकदा टेम्प्लेट ठेवा, पिना लावा, मार्किंग करा, पिना काढून स्ट्रीप कट करून घ्या.

आतापर्यंत आपण बॅगसाठी 2 रेक्ट्यॅग्युलर पीस तर बॅगच्या बेल्ट किंवा हॅंडलसाठी 3 स्ट्रीप कातरून घेतल्या आहेत.




दुसऱ्या शर्टवर आपण अशीच प्रक्रिया करायची आहे .

अधीसारखच बेल्ट साठी दोन रेक्ट्यॅंग्युलर पिस आणि 3 स्ट्रीप कातरुन घेतले आहेत. सर्वप्रथम बेल्टवर पिन लावून घ्या.. स्ट्रीपच्या सुलट बाजू समोरासमोर येतील अशा एकमेकांवर ठेवून त्यांची टोके पिनेने जोडून घ्या. आता दुसऱ्या स्ट्रीपचे टोक तिसऱ्या स्ट्रीपच्या टोकाला पिन लावून जोडून घ्या. दुसऱ्या आणि तिसऱ्या स्ट्रीपच्या सुलट बाजू एकमेकासमोर आल्या असल्याची खात्री करून घ्या. आता दुसऱ्या स्ट्रीपची खालची बाजू घ्या जेणेकरून दुसऱ्या स्ट्रीपचे उजव्या बाजूस तळाशी दर्शविल्याप्रमाणे तिसऱ्या पट्टीच्या उजव्या-बाजूच्या शीर्षाशी जुळेल आणि त्यास एकत्र पिन करा.







आता आपण स्क्वेअर पीसेस वर काम करणार आहोत. व्हिडिओमध्ये दाखवल्याप्रमाणे दोन्ही पीसच्या सुलट बाजू एकमेकांसमोर येतील असे ठेवत चारीही कॉर्नरवर पिन लावून एकमेकांना जोडून घ्या. ह्या स्क्वेअर पीसच्या टॉप साइडला फक्त 3 इंचाचा गॅप ठेवा आणी सर्व किनारे शिवून घ्या. ही 3 इंचाची गॅप बॅगेची सुलट बाजू बाहेर काढण्यासाठी उपयोगी पडेल. 3 इंचाचा गॅप चॉकने मार्क करा.




आता चेकर्ड शर्टकडे वळू. प्लेन शर्टप्रमाणेच या शर्टच्यादेखील सुलट बाजू समोरासमोर येतील अशारीतीने प्रथम 2 स्ट्रीप पिन लावून जोडून घेऊ. त्यानंतर दुसऱ्या स्ट्रीपच्या मोकळ्या टोकाला तिसरी स्ट्रीप, दोन्हीच्या सुलट बाजू समोरासमोर येथील अशा पिनने जोडून घेऊ. प्लेन शर्ट प्रमाणेच या शर्टचे स्क्वेअर पीस शिवायचे आहेत. दोन्ही स्क्वेअर पीस सुलट बाजू एकमेकांसमोर येतील असे चारही कोपऱ्यांवर पीन लावून जोडून घ्या. या कपड्यावर 3 इंचांची गॅप सोडण्याची गरज नाही.




ट्युटोरियलमध्ये दाखवल्याप्रमाणे व्यवस्थित कटिंग झाल्यानंतर आता शिवणकाम सुरु करण्याची वेळ आहे. शिवणकाम करण्यासाठी आपण उषा जेनोमे अल्लुरे डीलक्स मशीन वापरणार आहोत. शिवणाची सुरुवात आपण चेकर्ड शर्टच्या पीस पासून करणार आहोत. यासाठी मशीनचा पॅटर्न सिलेक्टर डायल A वर तर स्टिच लेन्थ 2.5 ठेवा. स्क्वेअर पीसचा काठ मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा आणि शिवणकाम सुरू करा. या स्क्वेअर पीसची टॉप बाजू वगळून इतर तीन बाजू शिवायच्या आहेत हे लक्षात असू द्या. शिवणकाम करताना जेव्हा तुम्ही कॉर्नरवर पोहोचाल तेव्हा शिवण थांबवा, दोरा कट करा आणि पुढे टीप मारा.







टीप मारून झाली की व्हिडिओमध्ये दाखवल्याप्रमाणे कपड्याचे अनावश्यक दोरे कातरून टाका. आतापर्यंत आपण स्क्वेअर पीसच्या दोन उभ्या बाजू आणि तळबाजू शिवून घेतली पण टॉप साईड उघडी ठेवली आहे. आता व्हिडिओमध्ये दाखवल्याप्रमाणे पिन लावून घेतलेल्या स्ट्रीपचा एक काठ शिवून घ्या. टीप सुरू करताना आणि संपवताना टाके उकलू नयेत यासाठी आठवणीने रिव्हर्स स्टिचेस घाला.. शिवून झालेल्या काठाच्या पिन काढून टाका आणि दुसरा काठ शिवायला घ्या. या काठावर टिप मारून झाली की पिन काढून टाका. आपल्या तीनही स्ट्रीप एकत्र जोडून झाल्याचे तुम्हाला दिसत असेलच.



आता प्लेन शर्टचे पीसेस शिवायला घेऊ. पीसच्या एका काठापासून शिवायला सुरुवात करा, मात्र टीप घेताना तीन इंचाचा गॅप ठेवायला विसरू नका. याच गॅपमधून आपण बॅगची सुलट बाजू बाहेर काढणार आहोत. गॅपच्या खुणेवर काही रिव्हर्स स्टिचेस घ्या. दोरा कट करून गॅपच्या दुसऱ्या खुणेपासून टीप मारायला सुरुवात करा. कॉर्नर पर्यंत सलग टीप घ्या आणि नंतर दोरा कट करा. याच प्रकारे दुसऱ्या बाजूवरही टीप मारून घ्या. कपड्याचा काठ मशीनच्या प्रेसर फुटखाली जुळवून घ्या आणि कॉर्नरपर्यंत टीप घ्या. आपण या कपड्याची टॉप साईड तसेच मार्क केलेला गॅप यावर टीप मारणार नाहीत हे लक्षात असू द्या.







आता पिन लावून घेतलेली प्लेन स्ट्रीप चेकर्ड स्ट्रीपप्रमाणे शिवून घ्या. शिवणकाम झाले की पिन काढून टाका. स्ट्रीपसारख्या छोट्याशा तुकड्यावर देखील टीप मारताना रिव्हर्स स्टिचेस घेणे महत्त्वाचे आहे. तुमची टीप अशी दिसली पाहिजे.






आता दोन्ही स्ट्रीप एकमेकांच्या बाजूला ठेवून घ्या. प्लेन आणि चेकर्ड स्ट्रीपच्या सुलट बाजू एकमेकांसमोर आल्या पाहिजेत. त्यांचे कॉर्नर एकमेकांशी व्यवस्थित जुळत असल्याची खात्री करून घ्या. या दोन्ही स्ट्रीपचे काठ मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवून जुळवून घ्या आणि लांबीची बाजू शिवून घ्या. काठावर पोहोचेपर्यंत सलग टीप घ्या. आडव्या बाजूवर टीप न मारता दुसरी लांबीची बाजू शिवायला सुरुवात करा. टीप मारून झाली की दोरा कट करा. आपण स्ट्रीपची जी आडवी बाजू न शिवता सोडली होती त्यातून लुप टर्नर स्ट्रीपमध्ये घाला. लुप टर्नर उघड्या ठेवलेल्या आडव्या बाजूच्या दुसऱ्या टोकातून बाहेर येईपर्यंत ते स्ट्रीप मधून पुढे सरकवत राहा. आता इथे दाखवल्याप्रमाणे लूप कपड्यांमध्ये अडकवा आणि लुप टर्नर बाहेर खेचा. आता तुम्ही स्ट्रीपची आतली बाजू सहजपणे बाहेर काढू शकाल.




बॅगच्या हॅण्डलला व्यवस्थित आकार यावा यासाठी व्यवस्थित फ्लॅट करून घेणे आवश्यक आहे.
व्यवस्थित घडी तसेच यावरच्या सुरकुत्या निघून जाव्यात यासाठी आपण स्ट्रीपला इस्त्री करून घेऊ . इस्त्री केल्यानंतर आपली स्ट्रीप कशी सुबक आणि सुरेख दिसतेय ना ? आता बेल्टच्या संपूर्ण काठावर टीप मारून घेऊ.

आता वेळ आहे मेन बॅग शिवण्याची. यासाठी आपण शिवून बाजूला ठेवलेले दोन स्क्वेअर पीसेस घ्या. आपण चेकर्ड पीसचे काठ शिवून घेतले आहेत. या पीसच्या न शिवलेल्या भागातून कपड्याची आतली बाजू बाहेर काढा. हे करत असताना काठांकडे जास्त लक्ष द्या. व्यवस्थित आकार येण्यासाठी कपड्याचे कॉर्नर नीट बाहेर काढून घ्या.






यानंतर प्लेन लायनिंग फॅब्रिक घ्या आणि चेकर्ड फॅब्रिक त्याच्या आत ठेवा. यासोबतच चेकर्ड फॅब्रिकच्या आत बॅग स्ट्रॅप देखील घाला. लाइनिंग फॅब्रिक आणि चेकर्ड फॅब्रिकच्या सुलट बाजू एकमेकांसमोर असल्या पाहिजेत. हे तीनही लेयर्स एकमेकांना कसे जुळवायचे ते पाहू. प्रथम लाइनिंग फॅब्रिकची सीम स्ट्रीपच्या एका टोकाबरोबर मॅच करून घ्या आणि नंतर मेन बॅग फॅब्रिकची सिम लायनिंग फॅब्रिकच्या साईड सिमला जुळवून घेऊन ते स्ट्रीपच्या मध्यावर ठेवा. याप्रकारे तुम्हाला कपड्याचे तीन लेयर मिळतील. या तिन्ही लेयरना पिन लावून एकत्र जोडून घ्या. इथे दाखवल्याप्रमाणे आपली स्ट्रीप लाइनिंग फॅब्रिक आणि मेन बॅग फॅब्रिक यांच्या मध्ये यायला हवी हे लक्षात घ्या.




याच कृतीने दुसरी बाजू शिवून घेण्यापूर्वी बॅगच्या हॅंडलला कुठेही पीळ पडला नसल्याची तसेच स्ट्रीप दोन्ही मेन फॅब्रिकच्या मध्ये असल्याची खात्री करून घ्या. कपड्यांच्या सिमकडे लक्ष द्यायला विसरू नका.




शिवणकाम सोपे व्हावे यासाठी कपड्याच्या दोन्ही उभ्या बाजूंच्या टॉप साइडला पिन लावून घ्या. इथे दाखवल्याप्रमाणे आता आपण संपूर्ण बाजू शिवून घेणार आहोत.

कपड्याचा काठ मशीनच्या प्रेसर फुट खाली ॲडजेस्ट करून घ्या आणि शिवणकाम सुरु करा. बॅगच्या ओपनिंग वरून टीप घ्या तसेच बॅगेचे हॅण्डल ,सिम्सवर व्यवस्थित जोडले जात असल्याची खात्री करून घ्या. टीप सुरू करताना आणि संपवताना टाके पक्के व्हावेत म्हणून रिव्हर्स स्टीचेस घ्यायला विसरू नका.








आपण लायनिंग फॅब्रिक शिवत असताना सोडलेला 3 इंचाचा  गॅप आठवतो ना. या गॅपमधून बॅगचे मेन चेकर्ड फॅब्रिक बाहेर काढून घ्या. हे काम अगदी शांततेने आणि काळजीपूर्वक करा कारण यावेळी बॅगचे टाके तूटण्याची शक्यता असते. आता आपण हा 3 इंचाचा गॅप बंद करणार आहोत. त्यासाठी गॅप असलेला फॅब्रिकचा भाग मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा आणि त्यावर स्ट्रेट स्टिच टीप मारून तो बंद करा. गॅपवर टीप सुरू करताना आणि संपवताना रिव्हर्स स्टीचेस घ्यायला विसरू नका. आता बॅगेचे लाइनिंग परत बॅगेच्या आत घाला. आता आपल्याला बॅगेचे टॉप ओपनिंग व्यवस्थित करून घ्यायचे आहे. त्यासाठी इस्त्री करून घेऊ

बॅगेचे ओपनिंग व्यवस्थित फ्लॅट करून त्यावरून इस्त्री फिरवा. या प्रकारे संपूर्ण ओपनिंगला इस्त्री करून घ्या. आता शेवटचा  टप्पा शिल्लक राहिला आहे. इस्त्री केलेला भाग सुरक्षित करण्यासाठी शिवून घ्या

ओपनिंगच्या काठाची सुलट बाजू मशीनच्या प्रेसर फुट खाली ठेवा आणि संपूर्ण ओपनिंगवर टीप मारून घ्या.
ओपनिंगचा फोल्ड व्यवस्थित राहावा म्हणून बॅगच्या संपूर्ण ओपनिंगवर टिप मारून घ्यायची आहे.



आणि आपले शिवण काम पूर्ण झाले ! आपली DIY बॅग तयार आहे. तुमची टोट बॅग फक्त स्टायलिशच नाही तर पर्यावरण संरक्षक देखील आहे. तुम्ही ही बॅग कॉलेजला किंवा शॉपिंगला जाताना वापरू शकता. बॅगेला असलेला छोटा खिसा तुमच्या जवळ असलेल्या छोट्या वस्तू, चिल्लर किंवा इतर वस्तू ठेवण्यासाठी वापरू शकता. तुम्हाला ही बॅग नक्कीच आवडेल. आम्हाला तुमचे विचार कमेंट बॉक्समध्ये नक्की कळवा. हा व्हिडिओ लाईक, शेअर तसेच सबस्क्राईब करायला विसरू नका.